
# Nation, Nationalism and Literature





**Editors**

Dr. Dattaguru Joshi

Dr. Govind Kajrekar

Mr. Sharad Shirodkar

# NATION, NATIONALISM AND LITERATURE

Editors
Dr. Dattaguru G. Joshi
Dr. Govind G. Kajrekar
Mr. Sharad B. Shirodkar

**NATION, NATIONALISM AND LITERATURE**

**Editors :**

Dr. Dattaguru G. Joshi

Dr. Govind G. Kajrekar

Mr. Sharad B. Shirodkar

**First Edition :** 2020.

**Disclaimer :** Opinions expressed in the articles are those of the contributors and does not necessarily reflect the policies of the college.

**Publisher :**

Dr. G. G. Kajrekar,

I/C Principal,

Gogate-Walke College, Banda.

Tal: Sawantwadi, Dist.: Sindhudurg.

Maharashtra.

**Printed by :**

Bharati Mudranalay, Kolhapur.

**ISBN :** 978-81-925027-2-4

**Price :** 150/-

# INDEX

## English Section:


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Perceiving Nation, Nationalism and Citizenship through the Lens of Partition. | Lucy James | 11 |
| 2 | Problematizing narratives of postcolonial national identity: Counter discourse in Michael Ondaatje's *Anil's Ghost* and Vikram Chandra's *Sacred Games* | Vidya Hariharan | 22 |
| 3 | The Voice of a Dalit – 'Anti'- Nationalism in Sujata Gidla's ' *Ants Among Elephants'* | Jyoti Kiran Pisipati | 28 |
| 4 | Diasporic Consciousness in Contemporary Indian Women's Fiction in English: At a Glance | Dipali Kadam | 38 |
| 5 | Exploring Nationalism in Alfred Rose's Konkani Lyrics | Glenis Maria Mendonça | 45 |
| 6 | Raja Rao's *Kanthapura* – Reflection of Indian Freedom Struggle and Gandhian Philosophy | Mangesh Madhukar Gore | 56 |
| 7 | The Idea of Nation Reflected in Rabindranath Tagore's *Heaven of Freedom* And The Present Scenario | Manisha M. Mujumdar | 63 |
| 8 | Creating 'Voice' and 'Image': A Critical Study of the Portrayal of Women in Hindi Film Songs | Bharati P. Falari | 72 |
| 9 | Indian Nationalism and Literature | Monica Madhuchandrika Patil | 80 |
| 10 | Portraying Nationalism in the Nation *through the Novel 'The Home and the World,'* by Rabindranath Tagore | Siddhi Chandrakant Sangle | 85 |
| 11 | Reflecting Diaspora Sensibilities in Select Hindi Movies: A Comparative Analysis | Sopan N. Jadhav, Shashikant R. Mhalunkar | 92 |
| 12 | Nationalism and Post-Colonial Literature: A Brief Study with | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | reference to Salman Rushdie's Midnight Children | Bharat Arvind Tupere | 103 |
| 13 | Nation as Disintegrated and Confused Place in SaadatHasan Manto's *'Toba Tek Singh'* | Ujwala Vijay Patil | 109 |
| 14 | Nation, Nationalism, Literature and Library | Anil Ananda Shirke | 113 |
| 15 | *1984* : A Journey From Capitalism To Totalitarianism | Niranjan Arondekar | 122 |
| 16 | Indian Culture and Nationalism. | Dattaguru G. Joshi | 133 |


## कोंकणी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. | तुकाराम शेट हांच्या 'पांखलो' कादंबरेंतले राष्ट्रीयत्वाचे आयाम आनी राष्ट्रवादाचे पडसाद | रमा मुरकुंडे | १४९ |
| २. | बाकिबाब बोरकार आनी मनोहराय सरदेसाय हांच्या कविता विश्वांतल्यान आयिल्ली गोंयचे सुटकेची संकल्पना | उर्वशी नायक | १५९ |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रवाद : संकल्पना व स्वरूप | एन. डी. कार्वेकर | १६७ |
| २. | राष्ट्रवाद प्रज्वलित करणारी साहित्यकृती : 'गोमंतगाथा' | विनय माडगावकर | १७० |
| ३. | सानेगुरुजींच्या निवडक साहित्यातील राष्ट्रवाद | सदाशिव गंगाधर चुकेवाड | १८१ |
| ४. | गजानन रायकर यांच्या कवितेतील राष्ट्रवादी जाणिवा | नीता तोरणे | १८८ |
| ५. | प्राचीन मराठी संत कवींच्या साहित्यातील राष्ट्रवादाचे संदर्भ | भक्ती गोविंद महाजन | १९८ |
| ६. | राष्ट्र, राष्ट्रवाद आणि प्रवीण बांदेकर यांच्या 'इंडियन ॲनिमल फार्म' या कादंबरीतील राष्ट्रवादाचे स्वरूप | गोविंद काजरेकर | २०६ |
| ७. | राष्ट्रवाद आणि सानेगुरुजींचे काव्य | उज्ज्वला सामंत | २१४ |


## हिंदी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रनिर्माण में साहित्य की भूमिका और स्वरूप | शरद बाबणी शिरोडकर | २२१ |
| २. | वामनदादा कर्डक के काव्य में राष्ट्रवाद | देवीदास बोर्डे | २३० |
| ३. | समकालीन कथाओ में राष्ट्रीयता | एन. ए. कारेकर | २३५ |

# राष्ट्रवाद प्रज्वलित करणारी साहित्यकृती : 'गोमंतगाथा'

**विनय माडगावकर**

**प्रास्ताविक :**

समाजाचा एखादा घटक सामान्यपणे एखाद्या व्यक्तीची विचारधारा स्वीकारतो. त्यापैकी काहीजण त्या विचारातून साहित्यनिर्मिती करतात. समाजाचे प्रतिबिंब असलेल्या या साहित्यात समाजातील हे 'विचार' तथा 'वाद' दिसून येतात. गांधीवाद मांडणारे ते गांधीवादी साहित्य, मार्क्सवाद मांडणारे ते मार्क्सवादी साहित्य, अशा या साहित्यात विचारांना प्राधान्य दिले आहे. राष्ट्रवादाची निर्मिती ही कुणा एका व्यक्तीची नसून ती राष्ट्रप्रेमी समूहाची स्वयंस्फूर्त प्रकृती असते. साहित्यामधून ती शब्दरूपाने आविष्कृत होते, त्यात विचारांबरोबर भावनेचेही सहचर्य आहे.

**व्याख्या**

'राष्ट्रवाद' ही आपल्या मातृभूमीविषयी अंतर्मनात प्रज्वलित होणारी आत्मीयतेची चैतन्यमय भावना आहे, राष्ट्रहितकारक तेजस्वी विचारांची ऊर्जा आहे. 'राष्ट्राप्रति आत्मीयतेची भावना आणि राष्ट्रहितकारक विचार' हे दोन्ही घटक राष्ट्रवादासंदर्भात महत्त्वाचे आहेत.

**राष्ट्रसुक्त - मंत्रपुष्पांजली**

आम्हाला राष्ट्रवाद परका नव्हे, परकीयांचे गुणगान करणाऱ्यांनी नेहमी आक्रमकांना गौरवान्वित केले आहे. पराक्रमी महाराणा प्रतापांचा पुरुषार्थ दडवून 'अकबर द ग्रेट' म्हणून सांगितला. भारतातून 'पराभूत' होऊन गेलेला याच लोकांमुळे 'जो जिता वो सिकंदर' ठरला. याच लोकांनी राष्ट्रवाद आधी परदेशात निर्माण झाला मग भारतीयांनी स्वीकारला असा प्रचार केला. 'राष्ट्रवाद' हा शब्द आधुनिक असला तरी हा विचार आणि भावना वेद, शास्त्र, पुराणातूनही प्रवाहित होत राहिली. यातील मंत्रपुष्पांजली हे तर राष्ट्रसुक्त आहे.

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासनें
ते हं नाकं महिमान: सचंत यत्र पूर्वे साध्या: संति देवा:
ॐ राजाधिराजाय प्रसह्ये साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे

स मे कामान्कामकामाय मह्यम् कामेश्वरो वैश्रवणो ददातुं
कुबेराय वैश्रवणायें महाराजाय नमः
ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं
पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं
समंतपर्यायी स्यात्सार्वभौमः सार्वायु आंतादापरार्धात्पृथिव्यै
समुद्रपर्यंता या एक राळिति
तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति

भारतात सौराष्ट्र, महाराष्ट्र तसेच गौराष्ट्र हे प्रदेशावाचक शब्द होतेच. राष्ट्रकुट हे राजघराणे होते. गोव्यात 'राष्ट्रोळी' म्हणून स्तलाधीपती देवाची पूजा होते.

**राष्ट्रवाद ही चेतना :**

भारतात पूर्वी घराघरातून ही राष्ट्रभक्तीची विचारधारा प्रवाहित होत होती. भारतीय माता आपल्या मुलांना बालपणातच राष्ट्रवादाचे बाळकडू पाजत असे.

'आई, आई ये इकडे
माझे गाणे ऐक गडे
देश माझा हिंदुस्थान
देशासाठी देईन प्राण'

या अशा गीतामधून बालमनावर राष्ट्रभक्ती संस्कारित करणारा विचार म्हणजे राष्ट्रवाद. शालेय पातळीवर भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात 'भारत 'माझा' देश आहे.' 'जो भारतीय तो तो, माझा स्वकीय आहे.' हा पेरलेला विचार म्हणजे राष्ट्रवाद. तिरंगी ध्वजाला सलाम ठोकताना, राष्ट्रगीत म्हणताना, 'वंदे मातरम्!' 'भारतमाता की जय' अशा घोषणा देताना विद्युत प्रवाहाप्रमाणे नसानसातून सळसळणारी चेतना म्हणजे राष्ट्रवाद.

**राष्ट्रवादाचा स्त्रोत - 'गोमंतगाथा':**

भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचे अखेरचे तेजस्वी पर्व म्हणजे गोवामुक्ती संग्राम होय. ब्रिटिश भारतात येण्याआधी पोर्तुगीजांनी इ. स. १५१० मध्ये गोवा जिंकून घेतला. ख्रिस्ती धर्मप्रचार आणि रानटी अत्याचार करत पोर्तुगाली राजवट सुरू झाली. तिचा पहिला आक्रमक प्रतिकार कुंकळीच्या जाज्वल्य स्वाभिमानी गोवेकरांनी केला.[१] पोर्तुगीजांच्या या धर्मांध सत्तेविरुद्ध झुंज देत, प्राणार्पण करत दि.१५ जुलै १५८३ रोजी गोवामुक्ती संग्रामाला आरंभ झाला. प्रक्षोभक क्रांतीचा हा वणवा

गोव्याच्या इतर भागातही पेटला. गोवेकरांनी कधी शस्त्राघाता शस्त्रानेच उत्तर देत तर कधी सत्याग्रहाने हा संघर्ष अखेरपर्यंत सुरूच ठेवला. गोमंतभूमीच्या झुंझार वीरांची आणि वीरांगणांची प्रेरणादायी 'गोमंतगाथा' पुस्तकरूपाने आजच्या वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा मनोहर जोशी सरांचा प्रयत्न प्रशंसनीय आहे. त्यांचा हा 'गोमंतगाथा' ग्रंथ राष्ट्रवादाची ऊर्जा प्रदान करणारा 'अक्षरस्त्रोत' आहे.

**क्रांतिवीर कृष्णाला आश्रय देणारा गोमंतक :**

गोव्याचा इतिहास पोर्तुगीजांपासून सुरू होत नसून पोर्तुगीजांपूर्वी गोमंतकात आपल्या सत्ता व संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व होते, याचे संदर्भ भारतीय धार्मिक पुराणग्रंथात सापडतात. गोमंतकाचा उल्लेख महाभारताबरोबर इतर पौराणिक ग्रंथात असल्याचे प्रमाण मनोहर जोशी सर या पुस्तकाच्या आरंभी देतात. येथे आणखी एक उल्लेख महत्त्वाचा आहे. तत्कालीन गणराज्य गोकुळात बळाने अधिराज्य गाजवू पाहणाऱ्या कंसाविरुद्ध कृष्णाने क्रांती केली. 'हरिवंश' या ग्रंथानुसार श्रीकृष्णाने मथुरानरेश कंसाचा वध केला, त्याचा प्रतिशोध घेण्यासाठी त्याचा सासरा जरासंध मथुरेवर वारंवार आक्रमणं करत होता. शेवटी युद्धनीतीचा भाग म्हणून क्रांतिवीर कृष्ण तेथील समरांगणातून पळून याच गोमंतकाच्या आश्रयाला आले होते. ही घटणा कोंकणी अस्मितेचे प्रणेते शणै गोंयबाब यांनी आपल्या मराठी लेखात सप्रमाण स्पष्ट केली आहे.[२] चोडण व मार्शेल येथील देवकी-कृष्ण मंदिरे याच पौराणिक इतिहासाची साक्ष देत आहेत.

**'गौराष्ट्र' - गोवा :**

'गोमंतगाथा' लेखनामागचा हेतू स्पष्ट करताना जोशीसर लिहितात, 'आजच्या पिढीला आपल्या देदीप्यमान अशा इतिहासाची किमान ओळख व्हावी एवढाच माफक उद्देश आहे.' त्यानुसार सरांनी पोर्तुगीजपूर्व गोमंतकातील राजसत्तेचा कालानुक्रमे परामर्श घेतला आहे. मौर्य, भोज, शिलाहार, कदंब या राजघराण्यांनी दिलेले योगदान लक्षणीय आहे. तसेच दक्षिण गोमंतकाच्या भागात कर्नाटकातील महाराज कृष्णदेवराय यांचीही सत्ता होती. ज्यांनी जागतिक दर्जाची प्रतिष्ठाप्राप्त 'हंप्पी' ही पाषाणशिल्प नगरी निर्माण केली. डॉ.वि.बा. प्रभुदेसाई यांच्या मतानुसार, ''प्राचीनकाळी कारवार व त्याचा परिसर यांचा समावेश 'गौराष्ट्र' म्हणजे गोव्यात होत असे.''[३]

**गोव्यातील प्राचीन विद्यापीठ :**

'गोमंतगाथा' या पुस्तकाच्या 'शिलाहार ते कादंब' या लेखात जोशीसर

लिहितात, 'चौदाव्या शतकात कदंबाच्या त्रिभुवनदास या राजाने त्या काळात विद्यापीठ स्थापन केले होते. त्यात वेदविद्या, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान, वैद्यकशास्त्र शिकवले जात होते. तसेच कदंबाच्या काळात गोपकापट्टण हे महत्त्वाचे व्यापारी बंदर होते. सागरीमार्गाने झान्जीबार, बंगाल, गुजरात तसेच श्रीलंका, आफ्रिका ते मलाया या देशांपर्यंत या बंदरातून व्यापार चाले.' गोमंतभूमीला गौरवान्वित करणारे हे दोन्ही विषय आजच्या वाचकांना या पुस्तकाच्या माध्यमाने नव्याने समजणार आहे.

**व्हाश्कू ड गामा :**

त्या काळी भारतात सुवर्णयुग नांदत होते. हा देश ज्ञान, विद्या, धन, ऐश्वर्याने समृद्ध होता. जोशीसरांच्या शब्दात सांगायचे झाले तर 'युरोपियन देशाच्या तुलनेत हा देश खूपच समृद्ध होता.' युरोपियन लोकांना भारताशी थेट व्यापारी संबंध प्रस्तापित करण्याच्या उद्देशाने सागरीमार्ग शोधणे गरजेचे होते. "In 1497, John's successor, King Manuel I (crowned in 1495), chose da Gama to lead a Portuguese fleet to India in search of a maritime route from Western Europe to the East.[4] पोर्तुगालच्या राजाने व्हाश्कू द गामाला ही दिलेली जबाबदारी गामाने पार पडली, भारताकडे येण्यासाठी समुद्रीमार्ग शोधला. कालीकटहून परत जाताना मलबारवरील लोकांना बरोबर घेतले, त्यांचे धर्मांतर केले. जोशीसरांनी व्हाश्कू द गामाचा इतिहास कथन करताना त्याचे स्वभावचित्रही रेखाटले आहे. 'व्हाश्कू द गामाच्या दुसऱ्या सफरीत माक्केहून हिंदुस्थानकडे सागरीमार्गातून येणाऱ्या गलबतावर व्हाश्कू द गामाने हल्ला चढवला. त्यावरील लोकांचे धन, अलंकार लुटले आणि क्रूरपणे त्या निष्पाप स्त्रीपुरुषासह त्यांचा गलबताला आग लावून जाळून टाकले.'

**पोर्तुगीजांचे आक्रमण :**

व्हाश्कू द गामाने शोधलेल्या जलमार्गाने पोर्तुगीज अत्याचारी पारतंत्र्य घेऊन गोव्यात आले. फ्रांसिस्कू द अल्मेदानंतर आफोन्सू द आल्बुकेर्क गव्हर्नर म्हणून हिंदुस्थानात आला. गोव्यात पळून आलेल्या नायट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी विजयनगरचा अधिकारी तिमोजाने आल्बुकेर्कला मदतीला बोलावले. आल्बुकेर्कने १० फेब्रुवारी १५१० रोजी तिसवाडी जिंकून घेतली. 'पोर्तुगीजांचे धार्मिक आक्रमण' या प्रकरणात जोशीसरांनी आल्बुकेर्कच्या अधर्मी कृत्यांचा समाचार घेतला आहे. गोमंतकीय जनतेचे धर्मांतर आणि मंदिरांचा विध्वंस सुरू केला. याविषयी मनोहर हि. सरदेसाई आपल्या 'गोमंतकीय ख्रिश्चन समाजनिर्मिती व कार्य' या पुस्तकात

केली. 'पोर्तुगीजांचा राज्यविस्तार आणि पिंटोचे बंड' हा सरांचा लेख लक्षवेधी आहे. 'लुईस दे मेनेझीस ब्रागांस', 'तेलु दे मश्कारेनेश', 'त्रिस्तांव ब्रगांस दे कुन्ह' या लेखामधून जोशीसरांनी या तिन्ही गोमंतभूमीच्या राष्ट्रवादी सुपुत्रांना शब्दसुमनांनी वाहिलेली आदरांजली वाचकांच्या मनात नवचेतना निर्माण करणारी आहे.

**क्रांतीच्या मशाली पेटल्या :**

सत्तरीचे झुंजार नरवीर दीपाजी राणे यांनी पोर्तुगीजांना दिलेले कडवे आव्हान धाडसी होते. त्यांच्या क्रांतीला मिळालेला जनाश्रय आणि दीपाजींचे कुशल नेतृत्व यांच्यासमोर पोर्तुगीजांना मान झुकवावी लागली. 'दीपाजी राणेचा उठाव भाग १व२' यांत हा संघर्षमय इतिहास जोशीसरांनी मांडला आहे. '१८ जूननंतर', '१८ जुलैचे आंदोलन', 'काँग्रेसची स्थापना व श्री भेम्ब्रेचा सत्याग्रह', 'पहिला मोठा सत्याग्रह', 'सत्याग्रहांची मालिका सुरूच' या लेखांमधून सक्षम नेतृत्वाखाली गोव्यातील सर्वसामान्य जनता क्रांतिकार्यात कशी सक्रिय झाली याचा आलेख मांडला आहे. शांततामय सत्याग्रहांचा कोणताच परिणाम माजलेल्या सत्ताधीशावर होत नव्हता. जोशीसरांच्या भाषेत सांगायचे झाले तर 'सरकारला सभ्य भाषा कळत नाही, त्यामुळे त्यांना कळेल अशा भाषेतच कृती करावी लागेल.' आमच्या भाषेत 'लातोंके भूत, बातोंसे नही मानते'. 'शस्त्राघाता शास्त्रच उत्तर' हे समजून क्रूर पोर्तुगीजांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी 'आझाद गोमंतक दला'ची गोव्यात स्थापना झाली.

**क्रांतिपर्व आणि बलिदान :**

भारतात इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांनी सत्ता संपादन केली. त्याआधी इ. स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोवा जिंकून घेतले. १५ ऑगस्ट १९४५ साली भारत स्वतंत्र झाला. तद्नंतर सुमारे १४ वर्षांनी १९ डिसेंबर १९६१ रोजी पोर्तुगाली सत्तेपासून गोवा मुक्त झाला. या प्रश्नाचे उत्तर 'आझाद गोमंतक दल' या लेखात वाचकांना मिळते. 'क्रांतिपर्वाची सुरुवात', 'म्हापश्यात फाजेंदवर हल्ला', 'दलाची पर्वरीतील कारवाई',' 'आंबेडगाव-माटणे येथील थरारक हल्ला.' 'दलाचे आंबोली येथील प्रशिक्षण', 'गायतोंडेन अटक', या अभ्यासपूर्ण लेखांमधून सरांनी पराक्रमी गोवेकरांच्या सशस्त्र क्रांतीची प्रेरणादायी शौर्यगाथा वर्णन केली आहे. 'बाळा राया मापारीचे बलिदान' हा लेख हृदयस्पर्शी आहे.

**'हे' दिवस गोव्याचे राष्ट्रीय सण :**

आम्हा गोवेकरांना १८ जून क्रांतिदिन माहीत आहे, तसाच १८ जुलै महत्त्वाचा आहे, हे '१८ जुलैचे आंदोलन' या लेखामुळे समजते. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन

ठाऊक आहे. तसाच हा दिवस '१५ ऑगस्ट १९५४ चा सत्याग्रह' या लेखामुळे आपण स्मरणात ठेवायला हवा हे कळते. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन म्हणून लक्षात राहतो, तसा '२६ जानेवारी १९५५ चा सत्याग्रह' हा दिवसही लक्षात राहायला हवा. 'सत्याग्रहांची मालिका' तसेच 'हल्ल्यांची मालिका' या लेखांमधून क्रांतीच्या दोन्ही प्रकारांचे ते कालानुक्रमे समर्पक आलेख मांडतात.

**राष्ट्रवादातून झाले 'गावड्याचे शुद्धीकरण' :**

गोमंतगाथेतील मानाचे पान म्हणजे 'गावड्याचे शुद्धीकरण' होय. या संदर्भात भारतकार हेगडे देसाई यांचा, त्यांच्याच 'भारत' या नियतकालिकातील लेख लक्षवेधक आहे. ते लिहितात, 'करंबळी, चिंबल, धुळापी व गोमंतकातील इतर ठिकाणी अनेक ख्रिस्ती गावडे आहेत. पण त्यांचा ख्रिस्तीपणा नुसता नावाचा आहे. त्यांना पुनरेव हिंदू धर्मात का घेऊ नये? श्री सद्गुरू विनायक महाराज मसुरकर यांच्या तेजस्वी धडाडीने व असामान्य धैर्याने अखेर ता.२६ फेब्रुवारी सन१९२६ फाल्गुन शुद्ध ६ शके १८४८ रोजी सकाळी चिंबल येथे हजारो लोकांच्या सान्निध्यात गोमंतकात शुद्धीची मुहूर्तमेढ रोवली.' गुरुवार दिनांक ३ मे १९२८ च्या अग्रलेखात भारतकार लिहितात, 'पोर्तुगीज सरकारच्या विरोधाची अडगळ लाथाडून शुद्धी चळवळ यशस्वी व जोमदार करण्याची प्रवृत्ती येथील हिंदूत वाढत चालली आहे. हे येथे नमूद करण्यास आम्हास अभिमान वाटतो.''[८] या ऐतिहासिक घटनेचे पडसाद इंग्लंडच्या पार्लमेंटात उमटले होते.

**क्रांतीत महिलांचा सक्रिय सहभाग :**

गोवामुक्ती संग्रामात महिलांचा सक्रिय सहभाग होता. 'स्त्रियांनी केवळ घर सांभाळणे एवढेच त्यांचे काम नाही तर या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी पुरुषांबरोबर काम केले पाहिजे.' मराठी भाषेत असे गोमंतकीय नारीशक्तीला आवाहन करणारी रणरागिणी कृष्णाबाई धेम्पे '१८ जुलैचे आंदोलन' या लेखात दिसते, तर सुधाताई जोशींचं 'सत्याग्रह' या लेखात सुधाताईंचे क्रांतीकार्य समजते. शारदाताई सावईकर यांचे कार्य प्रेरणादायी आहे. नंदिनी म्हाडेश्वर यांच्या 'गोवा लढ्यातील वीरांगना' या पुस्तकात अशा कर्तृत्ववान महिलांचे पराक्रम वर्णन केले आहेत.

**फितुरी - राष्ट्रवादाला लागणारा रोग :**

'परकीयांना फितूर होऊन स्वकीयांशी लढण्यात धन्यता मानणाऱ्या लोकांनी जितके या देशाचे नुकसान केले तितके प्रत्यक्ष कोणत्याही शत्रूने केले नसेल' जोशीसरांचे हे कटू असले तरी सत्य विधान आहे. जयचंदच्या फितुरीमुळे महम्मद

घोरीशी झुंज देणारे पृथ्वीराज चौहान पकडले गेले. बाजी घोरपडे फितूर झाला म्हणून शहाजी राजे पकडले गेले. गणोजी फितूर झाला म्हणून शंभूराजे पकडले गेले. ग्वाल्हेरचा सिंधिया फितूर झाला, झाँसीची राणी लक्ष्मीबाई पराभूत झाली. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात गणेश द्रविड फितूर झाला म्हणून चाफेकर बंधू पकडले गेले याला गोवामुक्ती संग्रामही अपवाद राहिला नाही. जोशीसरांनी आपल्या विविध लेखांमध्ये या विषयाकडे लक्ष वेधले आहे. ते लिहितात, शिवकाळात कुडाळच्या लाखां सावंताने शिवाजी महाराजांना मदत न करता रुस्तमजमला मदत केली. शंभूराजांच्या मोहिमेवेळी फोंड्याचे दुलाबा नाईक देसाई पोर्तुगीजांना फितूर झाले. पेशव्यांचा काळात कुंभारजुव्याचे विठुजी धुमे, साखळीचे गोपाळ शेणवी तर पिंटोच्या बंडावेळी पाद्री कायतन जुझे लोबो पोर्तुगीजांना फितूर झाले.

**राष्ट्रवाद जगवणाऱ्या गोमंतकीय मराठी साहित्यकृती :**

मनोहर जोशी सरांच्या मतानुसार 'अनेक प्रसंगाने भरलेला इतिहास हा विषय भाषेच्या अंगाने लिहिला गेला तर मुलं तो नक्कीच आवडीने अभ्यासतील.' हे खरे आहे. मोहन रानडे यांचे आत्मचरित्र 'सतीचे वाण', पा.पु.शिरोडकर यांचे 'आठवणी माझ्या कारावासाच्या काळ्या-निळ्या पाण्याच्या', गजानन रायकर लिखित 'स्वातंत्र्यलढ्यातील काही आठवणी', क्रांतिवीरांच्या जीवनावरील नलिनी देशपांडे लिखित कादंबरी 'जय हिन्द मास्टर', रेखा मिरजकर लिखित 'जिणे गंगौधाचे पाणी' या साहित्याकृतीबरोबर कवितेचा विचार केला तर बा.भ.बोरकर, गजानन रायकर, जीवनमुक्त महाराज, नागेश करमली, मनोहरराय सरदेसाई या कवींनी गोवामुक्ती संग्रामाच्या काळात रचलेल्या क्रांतिगीतांचा स्वतंत्रपणे अभ्यास होणे आवश्यक आहे.

गोवामुक्ती संग्रामावरवर आधारित सखाराम बर्वेंचे नाटक 'जळता गोमन्तक' हे नाटक लक्षवेधी आहे. क्रांतीचा ज्वलंत इतिहास रंगमंचावर सादर करण्यास विष्णू सूर्या वाघ यांची 'सुवारी' तर डा. प्रकाश वज़रीकर यांची 'होमकांड' या एकांकिका सक्षम आहेत. CTBC'S International Research Journal, Vol. 4, Issue 1, ISSN: 2350-0905, Pune. 2017 आणि International Journal "Contemporary Reseach in India" संत साहित्याचे योगदान विशेषांक, मार्च २०१८ सोलापूर. या दोन आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये शिवोलीतील सद्‌गुरूजीवन्मुक्त महाराज या धर्मगुरूंनी पोर्तुगीजीविरुद्ध आरंभ केलेल्या धर्मक्रांतीवर शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. तसेच डॉ. सोमनाथ कोमरपंत संपादित 'डॉ. पुंडलिक गायतोंडे जीवनरेखा' सारखे ग्रंथ भावी वाचकांना तसेच संशोधकांना

उपयुक्त ठरणार आहे.

**गोवा विद्यापीठाचे योगदान :**

गोवा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाने 'गोवामुक्ती संग्राम आणि मराठी साहित्य' हा विषय २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे प्रशंसनीय कार्य केले आहे. हा विषय गोमंतकीय महाविद्यालयातील कला शाखेत अध्ययन करणाऱ्या तृतीय वर्षाच्या मराठी विद्यार्थ्यांसाठी आहे. तसेच गोवा विद्यापीठाच्या मराठी विभागाने २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून CBCS नुसार अभ्यासक्रमात गोमंतकीय स्वातंत्र्यसैनिक पा.पु.शिरोडकर यांचे 'आठवणी माझ्या कारावासाच्या काळ्या-निळ्या पाण्याच्या' या पुस्तकाचा समावेश केला आहे. त्यामुळे वर उल्लेख केलेल्या संदर्भग्रंथांबरोबर विद्यार्थ्यांना 'गोमंतगाथा' या पुस्तकाचाही लाभ होणार आहे.

**समारोप :**

गोमंतक ही कला व संस्कृतीने समृद्ध असलेली लोकभूमी आहे. अल्लाउद्दिन खलजीचा मलीक कफूर, महंमद तुघलक, युसुफ अदिलशहा, पोर्तुगीज असे परकीय संस्कृतीचे आक्रमक येथे आले आणि राज्य करून गेले.[९] येथील प्रथा, परंपरा व संस्कृती नष्ट करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची इतिहासात नोंद आहे.[१०] तरीही या सर्व आव्हानांना, आक्रमकांच्या आघातांना सामोरे जात गोमंतभूमीची अस्मिता गौरवान्वित होत राहिली. हेही वास्तव आहे की व्हाश्कू या Portuguese: माणसाचे नाव आमच्या गोव्यातील शहराला अजून आहे. गोव्यातील आमच्या गावांच्या नावांचा उच्चार चुकीच्या पद्धतीने करणारे पोर्तुगीज गेले. पण अजून त्यांनी उच्चारलेली सदोष ग्रामनावे तशीच आहेत. स्वाभिमान जागवून प्रयत्न केल्यामुळे 'Bombay' मुंबई झाले, तर गोव्यात 'Sanquelim' चे 'साखळी' झाले. तसेच 'India' तसे 'भारत' म्हणून अखिल विश्वात परिचित व्हायला हवा. याचे कारण पुढे नमूद करत आहे.

"In whole world only our nation is known by three different names Hindusthan, Bharat and India. Asian countries like Afganisthan, Pakisthan, Bangaladesh, Nepal calling our nation as "Hidusthan'. For western countries like England, America our Nation is "India' and we are Indians. In Oxford Dictionary page no. 789. I found meaning of word "Indian'. According to them "the terms Indian and Red Indian are today regarded as old-fashioned and inappropriate, recalling, as they

do, the stereotypical portraits of the Wild West". A person who will refer that Oxford Dictionary and don't know anything about India and Indian, he will learn meaning of Indian as "Unfashionable, backward is known as Indian." When our constitution was translated in our languages, they translate Indian constitution "Indian' as "Bharatiy.' "Bharatiy Sa?vidhan,' and so I prefer Bharat."[11] हे प्रयत्नसाध्य आहे. त्यासाठी राष्ट्रवाद प्रज्वलित व्हायला हवा. गोमंतकीय साहित्यमालेत राष्ट्रवाद जागवणारी 'गोमंतगाथा' अभ्यासकांना तसेच संशोधकांना अभ्यास करण्यास प्रवृत्त करणारी आहे. लहान मुलांपासून सर्व वयोगटातील वाचकाच्या मनात राष्ट्रवादाची प्रेरणा प्रज्वलित करणारी आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. प्रभुदेसाई, उल्हास, कथा, गाथा नि व्यथा क्षत्रियांची, केपे.

२. शणै गोंयबाब, काही मराठी लेख, गोमन्तक छापखनो, गिरगांव मुंबै ४.

३. प्रभुदेसाई, वि.बा., गोमंतकाचा मराठी वारसा, गोमंतक मराठी अकादमी, गोवा.

४. History.com Editors, Vasco de Gama, Updated 21 Aug.2018

५. पियोळकर, अ. का., गोवन इन्क्विझिशन, राजहंस प्रकाशन, पणजी, गोवा.

६. प्रभुदेसाई, वि. बा., सतराव्या शतकातील गोमंतकीय बोली, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

७. पोर्तुगीज-मराठे संबंध, डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर, पुणे विद्यापीठ, पुणे.

८. 'भारत'कार हेगडे देसाई यांचे निवडक अग्रलेख, खंड १, संपा. शशिकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमी, गोवा.

९. गडकरी, माधव, असा हा गोमंतक, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.

१०. नागवेकर, पांडूरंग, सच्चे हिंदू इथे चिरविश्रांती घेत आहेत, शिल्पकार प्रकाशन, फोंडा, गोवा.

११. Madgaonkar, Vinay, "Goan freedom Struggle and "Hom-kand' Started by Jeevanmukt Maharaj', International E-Research Journal, INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S, RESEARCH JOURNEY PEER REFREED & INDEXED JOURNAL, April-2019 Special Issue - 183 (A)


■